श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत टाकळीमियॉ तालुका राहुरी यांना गैरवर्तनाबाबत ग्रामपंचायत अधिकारी पदावरुन तात्पुरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

आदेश ग्रामपंचायत विभाग/ग्रांप३/क्र...१२२५८८९

दिनांक - ०५ / ०५/२०२५

संदर्भ- १. गट विकास अधिकारी पंचायत समिती राहुरी यांचे पत्र क्रमांक आस्था-२/३९/ दिनांक २५/०३/२०२५ समवेत दोषारोपपत्र ०१ ते ०४

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१)(अ)

ज्या अर्थी श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत टाकळीमियॉ तालुका राहुरी येथे कार्यरत असुन त्यांनी त्यांचे कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर केलेला आहे. त्यांनी ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून ग्रामसभा न घेतल्याचे निदर्शनास आलेले आहे.जिल्हा परिषद कर्मचा-याने सदैव सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक व बधंनकारक आहे. तथापि श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत टाकळीमियॉ यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी ग्रामसभा न घेण्याचे व कामकाज करण्यात कसुर करुन त्यांचे कर्तव्याचे पालन न करता महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३ चा भंग केलेला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१) अ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधीन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिस्तविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत टाकळीमियॉ तालुका राहुरी यांचे विरुध्द शिस्तविषयक कार्यवाही सुरु व अनिर्णित असल्याने यांना सदरचा आदेश बजावलेल्या दिनांका पासून जिल्हा परिषद सेवेतुन ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन सेवा निलंबीत करीत आहे.

असाही आदेश देण्यात येत आहे की, हा सेवानिलंबन आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीत श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुख्यालय पंचायत समिती पं.स. नेवासा-------- येथे राहिल. त्यांना सेवानिलंबन कालावधीत देण्यात आलेल्या पंचायत समिती मुख्यालयाचे गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री. भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री. भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी यांनी खाजगी नोकरी अथवा कोणताही व्यवसाय स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास त्या बाबतचे पुरवणी दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल. तसेच ते पुढील सेवानिलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

सेवानिलंबनाचे कालावधीत श्री. भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवानिलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल. त्या त्या वेळी त्यांनी कोणतीही खाजगी नोकरी स्विकारली नाही ,अथवा कोणताही खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. अशा आशयाचे प्रमाणपत्र सेवा निलंबीत कालावधीत त्यांना दिलेल्या मुख्यालयाचे गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना सादर करावे.

श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवा निलंबन कालावधीतील निर्वाह भत्ता नियमाप्रमाणे अदा करण्याची कार्यवाही या आदेशान्वये सेवा निलबींत केलेनंतर दिलेल्या मुख्यालय तालुक्याचे गट विकास पचायत समिती हे करतील.

या आदेशाची नोंद श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिपदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०५०८०६००६९ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 08-05-2025 15:31:23
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिपद अहिल्यानगर

प्रति,
श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत टाकळीमियाँ तालुका राहुरी
व्दारा :- गटविकास अधिकारी पंचायत समिती राहुरी
प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती राहुरी
२/-सदर सेवा निलंबन आदेश श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे ग्रामपंचायत अधिकारी यांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व त्याची पोहच विना विलंब सादर करावी.
प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती पं.स. नेवासा ---- जिल्हा अहिल्यानगर.
२/- श्री.भाऊसाहेब गंगाधर निमसे सेवा निलबीत ग्रामपंचायत अधिकारी आपले मुख्यालयी हजर झालेचा अहवाल सादर करावा.